नि. फौ.ख.क्र. २७८/२०२२
सरकार–वि– सुमित
<u>निशाणी क्र. १८</u>

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u> – प्रमोद भाऊरावजी चिखले,**
**<u>वय</u> – ४० वर्ष, <u>व्यवसाय</u> – खाजगी नोकरी,**
**<u>पत्ता</u> – वाकी, तह. सावनेर, जि. नागपूर.**

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.आय.बारसकर वकीलांमार्फत</u>.**

**०१)** मी आरोपीला ओळखतो, तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. घटना एक वर्षापूर्वी वाकी शिवारामध्ये दुपारी २.०० ते ३.०० वाजेच्या दरम्यान घडली. त्यावेळी मी पाटणसावंगीवरुन वाकीला बाईकने जात होतो. आरोपी विरुध्द दिशेने बाईकने येत होता. आरोपीने माझ्यासोबत बाचाबाचा केली की मी त्याला कट मारला. त्यानंतर आम्ही आपआपले निघुन गेलो. मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली. आता मला मी दिलेली तोंडी रिपोर्ट दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे, परंतु त्यातील मजकूर मला वाचून दाखवला नाही त्यामूळे त्यातील मजकूर बरोबर नाही. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे, परंतु त्यातील मजकूर बरोबर नाही. या घटनेव्यतिरिक्त अजुन कुठलीही दुसरी घटना घडली नाही.

**(साक्षीदार हा त्याच्या पुर्वीच्या जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.)**

**०२)** हे म्हणणे **खरे नाही** की, दिनांक २१/०६/२०२२ रोजी पाटणसावंगी ते वाकी रोडवर आरोपीने मला कट मारली म्हणून रस्त्यावर पडलेला दगड उचलून माझ्या कानावर मारला. हे म्हणणे **खरे नाही** की, त्यामुळे माझे कान फाटला व मला १४ टाके लागले. हे म्हणणे **खरे आहे** की, आरोपी व माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे. मला केस चालवायची नाही. निशाणी १७ प्रमाणे आपसी समझौता पुरसीस दाखल केली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे **खरे नाही** की, आरोपीला वाचविण्याकरिता आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

नि. फौ.ख.क्र. २७८/२०२२
सरकार–वि– सुमित
निशाणी क्र. १८

आरोपींतर्फे श्री. डी.जी.केदार वकील यांचेमार्फत उलटतपास नाकारला.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**
दिनांक ०६/१०/२०२३

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.**

**नि. फौ.ख.क्र. २७८/२०२२**
**सरकार–वि– सुमित**
**<u>निशाणी क्र. १८</u>**

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव - शारदा अ. मिसाळ